REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार तारीख ६ डिसेंबर, १९४४ अंक ४८




व्ही. पी. बेडेकर
आणि सन्स लि.
मुंबई.
मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंटः—
द. ना. हेजीब

JUST PUBLISHED

**INDIAN RURAL PROBLEM**

BY

Sir Manilal Nanavati and Prof. J. J. Anjaria.

( Issued by the Indian Society of Agricultural Economics, Bombay ).

**Price Rs. 8**

( Postage extra ).

*Sole Selling Agents* :—

**THE CO-OPERATORS' BOOK DEPOT.**

9, BAKEHOUSE LANE,
FORT, BOMBAY.

" Consent of the Central Government has been obtained to this issue under Defence of India Rule 94-A. It must be distinctly understood that in giving this consent the Government of India do not take any responsibility for the financial soundness of any schemes or for the correctness of any of the statements made or opinions expressed with regard to them."

**दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.**

स्थापना : १९३५
हेड ऑफिस : पुणें शहर

**विक्रीस काढलेलें नवीन भांडवल**

**रु. १०,००,०००**

( प्रत्येकीं रु. ५० च्या २०,००० भागांत विभागलेलें )

वरील शेअर्स ता. ४-१०-४४ रोजीं बँकेच्या रजिस्टरवर असलेल्या शेअर-होल्डरांना त्यांच्या प्रत्येक जुन्या १ शेअरला १ नवीन शेअर असे रु. ५ वाढीनें देऊं केले आहेत. पहिल्या शेअर-होल्डरांनीं घेऊन उरलेले शेअर्स इतरांस तेवढ्याच वाढीनें (रु. ५) देण्यांत येतील. अर्ज पाठविण्याची शेवटची तारीख १५-१२-४४ ही आहे.

—डायरेक्टर बोर्ड—

श्री. धों. कृ. साठे, चेअरमन

श्री. व्ही. पी. वर्दे, प्रो. व्ही. जी. काळे, श्री. एन. जी. पवार, श्री. टी. व्ही. रानडे, श्री. आर. सी. सोहोनी, श्री. एस. जी. मराठे, श्री. एम. आर. जोशी, श्री. एफ. डी. पदमजी, श्री. एम. व्ही. गोखले, श्री. व्ही. एच. देशमुख.


विशेष माहितीसाठीं लिहा.

सी. व्ही. जोग, मॅनेजर

**सांडू हार्टिना**

छातींत धडधडणे, धाप लागणे, छातींत कळ आणि जळजळ वाटणे, रक्ताचा दाब वाढणे व हृदयाची अशक्तता यांवर फार गुणकारी.

ओरिजिनल
ब्राम्ही तेलाचे
कारखानदार.



पुणें चीफ एजंट :
मे. श्रीदत्त एजन्सी
१०० रविवार पेठ,
मोती चौक, पुणें २.

कोल्हापूर विक्रेते :
मे. भागवत आणि कं.
कांच टाइन

सातारा जिल्हा एजंट :
मे. जोशी आणि मंडळी
भवानी पेठ.

## विविध माहिती

**देना बँकेच्या तीन नव्या शाखा**

देवकारण नानजी बँकिंग कं. लि. च्या अमरेली येथील शाखेचें उद्घाटन शुक्रवार, ता. ८ रोजीं श्री. रतिलाल मुळजी गांधी, बी. ए., एम. एल. सी. ह्यांच्या हस्तें होणार आहे. राजकोट येथील शाखेचें उद्घाटन सोमवार ता. ११ रोजीं राजकोटचे ठाकूरसाहेब हिज हायनेस श्री. प्रद्युम्नसिंहजी ह्यांच्या हस्तें होईल. मनमाड उपशाखेसहि ता. ११ रोजीं प्रारंभ होईल. अशा तऱ्हेनें देना बँकेच्या शाखांची संख्या आतां ३३ होईल.

**"डॉ. कोटणीस" चित्रपटाची प्रसिद्धि**

डॉ. कोटणीस ह्यांच्या जीवनवृत्तांतावर श्री. व्ही. शांताराम हे इंग्रजी भाषेंत बोलपट काढीत आहेत, त्यास अमेरिकेंत प्रसिद्धि देण्याचें काम मि. फाझलभाई हे न्यूयार्क येथें करीत आहेत असें वृत्त प्रसिद्ध झालें आहे.

**सरकारी इंजिनियरला सहा महिने कारागृहवास.**

मुंबई सरकारच्या औद्योगिक खात्यांतील इंजिनियर, मि. एम्. ई. हॅस्केल, ह्यांनीं निशात इंडस्ट्रीजचे भागीदार मि. लोबो ह्यांचेकडून कंत्राट देण्याबद्दल व पुऱ्या केलेल्या कामाच्या बिलांतील बाकी देण्याबद्दल ४२५ रुपये लांच घेतला, ह्या आरोपावर त्यांना मुंबईच्या चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटनीं ६ महिने सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली. मि. हॅस्केल ह्यांस सरकारी नोकरींत दरमहा १,२०० रुपये पगार मिळत होता.

**जुन्या यंत्रसामुग्रीची खरेदी**

लँकेशायरच्या गिरण्यांतील वापरलेली यंत्रसामुग्री खरेदी करण्याचा कांहीं हिंदी गिरणीवाल्यांचा विचार असल्याचें समजतें. कांहीं सामुग्री आगबोटींत जागा मिळण्याची वाट पहात आहे.

**असेंब्लीची बैठक**

मध्यवर्ती असेंब्लीच्या अंदाजपत्रकाच्या बैठकीस दिल्ली येथें ता. १२ फेब्रुवारी रोजीं प्रारंभ होईल.

**सिमेंटच्या किंमती थोड्या उतरल्या**

आसाम, बेंगॉल सिमेंट कं. लि. खेरीजकरून बाकी सर्व कंपन्यांनीं उत्पादन केलेल्या पोर्टलंड सिमेंटच्या किंमती ७० रुपयांवरून ६८ रु. १२ आण्यांवर सरकारनें १ डिसेंबर, १९४४ पासून उतरविल्या आहेत.

**आगगाडीच्या फळीवरून प्रवास करणें बेकायदा**

आगगाडीच्या डब्यावरून किंवा पायरीवरून व फळीवरून प्रवास करणें आतां भारत संरक्षण कायद्याच्या ताज्या नियमानें बेकायदा ठरविलें आहे. हा नियम मोडणाराची उचलबांगडी कोणताहि रेल्वे नोकर किंवा पोलीस अधिकारी करूं शकेल. सहा महिने तुरुंगवास व दंड अशी ह्या गुन्ह्यास शिक्षा सांगितलेली आहे.

**बचतीची मोहीम**

बचतीच्या मोहिमेचा पंधरवडा मुंबई प्रांतांत साजरा होणार आहे. त्यास प्रारंभ प्रांताचे गव्हर्नर ता. १२ रोजीं रेडिओवरील भाषणानें करतील.

**पॉवेल्स लि.**

वरील कंपनीस ३० जून, १९४४ अखेर संपलेल्या वर्षी ७४,४२७ रुपये नफा झाला. भागीदारांस ४½% करमाफ डिव्हिडंड मिळालें.

## २ लक्ष रुपयांस ३०० एकरांची खरेदी

रावबहादुर शेंबेकर ह्यांची राजेगांव (ता. दौंड, जि. पुणें) येथील ३०० एकरांची इस्टेट श्री. श्री. र. राजगुरु व श्री. देशपांडे ह्यांनीं श्री. न. गं. आपटे ह्यांचे सहकार्यानें सुमारें २ लक्ष रुपयांस नुकतीच खरेदी केली आहे, असें समजतें. खरेदी करणाऱ्या गृहस्थांचा विचार महाराष्ट्रांतील शेतीस अनुषंगिक धंद्यांची वाढ करण्याचा असून ज्यांना असे धंदे काढावयाचे असतील त्यांना जागा व कच्चा माल ह्यांचा पुरवठा व विक्रीची व्यवस्था करण्याचा आहे. राजेगांव जी. आय. पी. च्या डिक्सळ रेल्वे स्टेशनपासून ईशान्येस दोन मैलांवर असून भीमा नदीचे कांठीं आहे. वालचंदनगरचें रेल्वे स्टेशन डिक्सळ हेंच आहे. जमिनीलगत सव्वा मैलाचा डोह आहे, त्यांतून ४० अश्वशक्तीच्या इंजनांच्या सहाय्यानें जमिनीस पाणी पुरविलें जातें. सध्यां तेथें ऊंस, संत्रीं, मोसंबीं, पेरू, द्राक्षें इत्यादि पिकें उभीं आहेत.

**म्हैसूरमध्यें सहकाराची प्रगति**

म्हैसूर संस्थानांत चालू वर्षी ८१ क्रेडिट सोसायट्या नवीन उघडल्या असून एक मार्केटिंग सोसायटीहि उघडली आहे. या सोसायट्यांनीं ४५,०८,८२१ रुपयांची उलाढाली केली. सत्तर सोसायट्यांनीं आपले स्टोअर्स सुरू केले असून त्यामार्फत ५,६२,४११ रु. ची विक्री व ५,४९,९३० रु. ची खरेदी करण्यांत आली.


**THE BRIHAN MAHARASHTRA SUGAR SYNDICATE, LTD., POONA 2.**

# NOTICE.

The tenth Annual General Meeting of the Shareholders of the Brihan Maharashtra Sugar Syndicate, Ltd., Poona 2, will be held on Sunday the 31st December, 1944 at 3 P. M. at the Tilak Smarak Mandir, Poona 2, to transact the following business :—

(1) To receive and adopt the Directors' Report and Audited Statements of Accounts for the year ended 30th September, 1944.

(2) To sanction the payment of a Dividend for the above mentioned period.

(3) To elect Directors in place of those who retire but are eligible for re-election.

(4) To appoint Auditors for the current year and fix their remuneration.

By order of the Board of Directors,
C. G. AGASHE & Co.,
*Managing Agents.*

Poona, 3rd December, 1944.

*Note* :—The Transfer Books of the Company will be closed from 16th of December, 1944 to 7th of January, 1945 (Both days inclusive).

The Dividend when declared will be made payable at the Bank of Maharashtra, Ltd., Poona, on and after the 7th of February, 1945.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ३९८ | स्वार्थत्याग—कायद्द्याप्रमाणे त्यांची कानउघाडणी. | |
| २ तीनशे एकरांची खरेदी | ३९८ | ६ बेलापूर कं. लि. ... | ४०२ |
| ३ बँकांच्या नियंत्रणासाठीं स्वतंत्र कायदा ... | ३९९ | ७ उद्योगी नागपूर ... | ४०२ |
| ४ शेअर बाजार ... | ४०० | ८ डिस्ट्रिक्ट जज्जांची नेमणूक ... ... | ४०३ |
| ५ स्फुट विचार... ... | ४०१ | ९ मार्गाचें तारण ... | ४०३ |
| मित्रराष्ट्रांची जर्मनींत चाल-इंग्लंडचा युद्धप्रयत्न व | | | |



# अर्थ

बुधवार, ता. ६ डिसेंबर, १९४४


## बँकांच्या नियंत्रणासाठी स्वतंत्र कायदा

### शाखा काढणारांवर भक्कम शेअर भांडवलाच्या अटी

आतांपर्यंत हिंदी बँकिंगच्या नियंत्रणासाठी स्वतंत्र असा कायदा अस्तित्वांत नाहीं. हिंदी कंपनी कायद्यांत कांहीं कलमें बँकिंग-संबंधाचीं आहेत एवढेंच. रिझर्व्ह बँकेचे त्यावेळचे गव्हर्नर, सर जेम्स टेलर, ह्यांनीं १९३९ सालीं हिंदी बँकिंग कायद्याचा एक मसुदा तयार करून रिझर्व्ह बँकेतर्फे हिंदुस्थान सरकारास सादर केला होता. रिझर्व्ह बँकेनें ह्या मसुद्यास प्रसिद्धी देऊन हितसंबंधी संस्था व व्यक्ती ह्यांचीं मतें मागविलीं. मध्यंतरींच्या युद्धकाळांत व्यापक प्रमाणावर बँकिंगचा कायदा तयार करून त्यास विधिमंडळाची संमति मिळविण्यास हिंदुस्थान सरकारला फुरसत झाली नाहीं. अगदीं जरूरीच्या अशा कांहीं दुरुस्त्या मात्र कंपनी कायद्यांत करून बँकिंगविषयक कलमें सुधारण्यांत आलीं. बँकिंगची व्याख्या स्पष्ट करणारी दुरुस्ती १९४२ सालीं झाली व मार्च, १९४४ मध्यें बँकांच्या भांडवलाची रचना सुधारणाऱ्या व बँकांच्या मॅनेजिंग एजंटांच्या व मॅनेजिंग डायरेक्टरांच्या करारांवर नियंत्रण घालणाऱ्या दुरुस्त्या करण्यांत आल्या. युद्धकाळांतील बँकिंगची वाढ व बँकिंगच्या धंद्याची प्रवृत्ति लक्षांत घेऊन, १९३९ च्या मूळ योजनेंत आतां सरकारला बरीच सुधारणा करावी लागली आहे. बँकिंगच्या कायद्याच्या सुधारणेचा विषय लोकांपुढें आज इतका दीर्घकाल आहे, कीं नव्या बिलाच्या विचारासाठीं फार मोठी मुदत ठेवण्याचें सरकारास कारण वाटलेलें नाहीं. १९४५ च्या मार्चपूर्वी बिलाचें कायद्यांत रूपांतर करून टाकण्याचा सरकारचा विचार दिसतो.

### नव्या कायद्यांतील प्रमुख बाबी

बँकिंग कायद्याच्या बिलांतील मुख्य बाबी खालीलप्रमाणें आहेत:—( १ ) बँकिंगची सुटसुटीत व्याख्या, ( २ ) किमान भांडवलासंबंधीं निर्बंध, ( ३ ) बँकिंगच्या क्षेत्राबाहेरील व्यवहार करण्याची बँकांस बंदी, ( ४ ) ब्रिटिश हिंदुस्थानाबाहेर नोंदलेल्या अथवा स्थापन झालेल्या बँकांचा कायद्यांत समावेश, ( ५ ) लिक्विडेशनचें काम लवकर संपण्याची व्यवस्था, ( ६ ) जरूर तेव्हां बँकांचे हिशेब रिझर्व्ह बँकेनें तपासण्याची तरतूद, ( ७ ) ठेवीदारांच्या हितास विघातक अशा रीतीनें कारभार करणाऱ्या बँकांवर इलाज करण्याची मध्यवर्ती सरकारास सत्ता व ( ८ ) ताळेबंदाच्या खास ठराविक नमुन्याप्रमाणें ताळेबंद तयार करण्याची सर्व बँकांवर सक्ती व वक्तशीर माहितीचे तक्ते मागविण्याचा रिझर्व्ह बँकेस अधिकार. ह्या आठ महत्त्वाच्या बाबींपैकी किमान भांडवलाविषयींच्या नियोजित निर्बंधांचा विचार येथें केला आहे.

### किती शाखांस किती किमान भांडवल हवें ?

बँकेचें वसूल भांडवल व रिझर्व्ह हीं मिळून ५०,००० रुपयांचीं असलीं म्हणजे झालें, अशी आजच्या कायद्याची अट आहे. ही मर्यादा वाढवून १,००,००० रुपये आतां करण्यांत यावयाची आहे. ह्या रकमेपेक्षा कमी भांडवलाच्या आकाराची बँक ह्यापुढें निघूं अगर राहूं शकणार नाहीं. कोणत्या बँकेनें कोठें व किती शाखा उघडाव्या, ह्यावर सध्या कोणत्याहि प्रकारचें नियंत्रण नाहीं. नव्या कायद्यानें ह्याबाबत जबर अटी घालण्याचें योजिलें आहे. २० लक्ष रुपयांचें वसूल भांडवल व रिझर्व्ह असणारी बँक कोठेंहि, कितीहि शाखा उघडूं शकेल, परंतु त्यापेक्षा कमी भांडवल व रिझर्व्ह असणाऱ्या बँकांस खालीलप्रमाणें बंधनें पाळावीं लागतील. उदाहरणार्थ:—

बँकेचें किमान भांडवल व रिझर्व्ह किती पाहिजे ?

| | ( रु. ) |
|---|---|
| एका प्रांतांतील बँकेस दुसऱ्या प्रांतांतील शहरांत शाखा उघडण्यास ... ... | २०,००,००० |
| संस्थानी हद्दींतील बँकेस ब्रि. हिंदुस्थानांत शाखा उघडण्यास ... | २०,००,००० |
| मुंबई प्रांतांतील बँकेस मुंबईत शाखा उघडण्यास ... ... | ५,००,००० |
| बंगाल प्रांतांतील बँकेस कलकत्त्यांत शाखा उघडण्यास ... | ५,००,००० |
| एक लक्ष लोकवस्तीवरील प्रत्येक शहरांतील शाखेस... ... | २,००,००० |
| इतर प्रत्येक ठिकाणच्या शाखेस ... | १०,००० |

### ब्रिटिश बँकांची जाहिरात

ब्रिटिश हिंदुस्थान किंवा ग्रेट ब्रिटन ह्याबाहेरील ठिकाणीं नोंदलेल्या बँकांनीं वरील तक्त्यांत नमूद केलेल्या किमान भांडवल व रिझर्व्हच्या आकड्याइतकी रकम रोख अथवा सरकारी रोखे ह्यांच्या स्वरूपांत रिझर्व्ह बँकेकडे ठेवली पाहिजे, असें नवा कायदा सांगतो. ह्याचा अर्थ, संस्थानी हद्दींत स्थापन झालेल्या बँकांना २० लक्ष रुपये रिझर्व्ह बँकेंत ठेवावे लागतील. ब्रिटिश बँकांवर जें बंधन नाहीं, तें शेजारच्या संस्थानीं हद्दींत नोंदलेल्या बँकांवर घालण्यांत येत आहे, ह्या गोष्टीवर टीका झाल्याविना राहणार नाहीं. ब्रिटिश बँका मजबूत असून त्या कोणतींहि बंधनें सहज पाळूं शकतील, हें खरें असलें तरी त्यांना कायद्याच्या सामान्य नियमांतून वगळण्यांत हित दिसत नाहीं. ब्रिटिश बँकांच्या मजबुतीची जाहिरात हिंदुस्थान सरकारनें कां करावी !

वरील तक्त्यावरून असें दिसून येईल, की शाखांसाठी आवश्यक ठरविलेल्या भांडवल व रिझर्व्ह ह्यांच्या आकड्यांचे संबंधांत शेड्यूल्ड व बिगर शेड्यूल्ड बँका ह्यांस एकाच पातळीवर ठेवण्यांत आलें आहे. शेड्यूल्ड बँकेस कोणतीहि जास्त सवलत मिळावयाची नाहीं. शाखांच्यासाठी आवश्यक केलेल्या भांडवलाच्या नव्या अटी फक्त सुमारें २५ प्रमुख हिंदी बँकांस जाचक होणार नाहींत. कारण, त्या सर्व बँकांचें वसूल भांडवल व रिझर्व्ह हीं २० लक्ष रुपयांवर आहेत. बाकी सर्व हिंदी बँकांनीं ह्या नव्या बंधनांचा विचार केला पाहिजे.

### भांडवल वाढविण्यांतील अडचणी

वरील जाचक अटी बँका कशा पाळूं शकतील ? ज्यांचें वसूल भांडवल व रिझर्व्ह हीं एक लक्ष रुपयांखालीं असतील, त्यांना भांडवल वाढवावें लागेल; त्याखेरीज त्यांचें अस्तित्वच टिकणार नाहीं. बाकीच्या बँकांना आपल्या शाखा कायम राखावयाच्या असतील, तर त्यांना वरील तक्त्याबरहुकूम भांडवलांत वाढ करावी लागेल. अर्थात् ज्यांनीं आवाक्याबाहेर पसारा मांडला असेल, त्यांना एवढें मोठें भांडवल उभारणें कठीण जाईल. शिवाय, भांडवल मिळालें तरी वाढलेल्या भांडवलावर मूळ डिव्हिडंडच्या दरानें कितीतरी जास्त डिव्हिडंड वाटावें लागेल, त्यासाठीं नफाहि पुष्कळ वाढणें जरूर आहे व तो कांहीं एकाएकी वाढूं शकणार नाहीं. २० लक्ष रुपयांचें भांडवल व रिझर्व्ह असणारी बँक चांगल्या तऱ्हेनें किफायतशीर चालण्यास तिचें खेळतें भांडवल किमान दोन कोटि रुपये तरी हवें. बँकांच्या खेळत्या भांडवलांत व व्यवहारांत एकदम भर कशी पडणार ? आणि ती पडण्याचा संभव विशेष नसला, तर भांडवल तरी सुलभतेनें कसें खपणार ? अर्थात्, बँकांच्या जबाबदार अधिकाऱ्यांनीं ह्या सर्व अडचणींचा विचार करूनच आपलें धोरण आखलेलें असलेंच पाहिजे, कारण ह्या अटी सरकार एकाएकीं लादूं पहात आहे, असें कोणासहि म्हणतां येणार नाहीं. भांडवल व शाखांची संख्या आणि ठिकाणें ह्यांचा संबंध जोडला जाणार आहे, ही गोष्ट गेलीं चार-पांच वर्षे सर्वांस माहीत आहे. तथापि, आगामी बंधनांची नुसती कल्पना असणें वेगळें व प्रत्यक्ष कायद्याच्या तपशीलवार अटी नजरेसमोर येणें वेगळें. महाराष्ट्रांतील बहुतेक बँकांना आगामी कायद्याचा चौकटींत येण्यासाठीं आपलें धोरण ठरवावें लागणार आहे. अर्थात्, कित्येकांनीं वेळींच पूर्व तयारी केली आहे.

### कांहीं महाराष्ट्रीय बँकांचें उदाहरण

बँकिंगच्या नियोजित कायद्याप्रमाणें न्यू सिटिझन बँक व महाराष्ट्र बँक ह्यांस प्रत्येकीं २० लक्ष रुपयांचें वसूल भाग भांडवल व रिझर्व्ह पुरीं करावीं लागतील, कारण त्या दोघांच्याहि प्रांताबाहेर शाखा आहेत. प्रेसिडेन्सी इं. बँकेची मुख्य कचेरी पुणें येथें असून मुंबईस शाखा आहे, ह्याकरितां तिला ७ लक्ष रुपये व भारत इं. बँकेची पुणें येथील मुख्य कचेरी व चार-पांच शाखा-उपशाखा आहेत ह्याकरितां तिला सुमारें २½ लक्ष रुपये ह्याप्रमाणें वसूल भांडवल व रिझर्व्ह हीं पुरीं करावीं लागतील. वरील चारहि बँकांनीं नव्या कायद्याचा मसुदा जाहीर होण्यापूर्वींच शेअरविक्री चालू केलेली आहे व त्यांस पाठिंबाहि चांगला मिळत आहे. चालू शेअरविक्री पुरी झाल्यावर आणखी भाग त्या सर्वांना अर्थात विकावे लागतील व आवश्यक भांडवल-रिझर्व्हची अट पार पाडावी लागेल.

### मुदत व रकम ह्यांबाबत सवलतींची आवश्यकता

भांडवल व रिझर्व्ह ह्याबाबत अटी कायद्याचा अंमल सुरू झाल्यापासून दोन वर्षांचे अवधींत बँकांना पुऱ्या पाडाव्या लागतील. ही दोन वर्षांची मुदत फारच थोडी आहे. ती वाढवून घेण्याचा संघटित प्रयत्न बँकांनीं केला पाहिजे. नाइलाजानें शाखा कमी कराव्या लागल्या तर त्यांत कमीपणा मानतां कामा नये. वीस लाख रुपये भांडवल व रिझर्व्ह असणारी बँक ही मोठी बँक व बाकीच्या बँका लहान व स्थानिक स्वरूपाच्या असा नव्या कायद्याचा मथितार्थ दिसतो. ही वीस लक्षांची अटहि निदान दहा लाखांवर आणण्याचा प्रयत्न करतां येण्याजोगा आहे. मोठ्या व वजनदार बँकांना वरील अट जाचक होत नसल्याकारणानें, मध्यम व लहान आकाराच्या बँकांसच आपली रास्त बाजू नेटानें पुढें मांडावी लागणार आहे; मोठ्या बँकांच्या सहकार्याची त्यांनीं अपेक्षा करणें व्यर्थ आहे.

---

## शेअर बाजार

(श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम्., १२८६ अ, शिवाजीनगर, पुणें ५)

मागील आठवडाभर बाजार मागें न पाहतां वरच चाललेले आहेत व लक्षणावरून हाच क्रम पुढील आठवडाभर रहावा. शुक्रवारीं डाईंग १८४७।८, नागपूर ४२३।८, सिंप्लेक्स २८७, स्वदेशी ५९२, मोरारजी ७३८-१२, अपोलो ४।७, इ. डी. ३।६, कोहिनूर ६१६, असे मजबून आहेत. अजून डाईंग व कोहिनूर यांत पुढें जाण्यास विशेष अवसर दिसतो. मात्र न्यू ग्रेटबद्दल सावध असावयास हवें. गोकाक अजून बराच रेंगाळत ३२१ वर आला आहे. मंदीवाल्यांच्या कापणीमुळें व वृषभांच्या (Bulls) टेक्यामुळें टाटा डिफर्ड व आर्डिनरी २१८३-१२, व ४०७ असे वर घेतले गेले आहेत. साडे तीन टक्का कागद १००-०-६ आहे तरी मागणी चांगलीच आहे व रहावी. एकूण बाजार तेजींत आले आहेत. सावध गुंतविणारांनीं त्याचा फायदा घेतलेला बरा. पुढें येणारी ८।१० दिवसांची सुट्टी लक्षांत ठेवावयास हवी. नुकतेंच सिमेंटनें सात रुपये व्याज जाहीर केलें आहे. २४७ च्या भावांत त्यामुळें सिमेंटला काय आकर्षण शिल्लक राहिलें आहे हें कळत नाहीं. केवळ युद्धोत्तर काळ चांगला आहे म्हणावें तर लोखंड, पोलाद, गिरण्या यांना काय वाईट येणार आहे हें विचारण्यासारखें आहे. घोरणी मंदीवाले ऋषभ (Bears) यापासून काय बोध घेतील हें सांगावयास नको.

---

### त्रावणकोर स्टीम नॅव्हिगेशन कं. लि.

वरील आगबोट वहातुकीची कंपनी त्रावणकोर संस्थानांत नोंदण्यांत आली असून तिच्या भाग भांडवलापैकी ५१% भांडवल संस्थानानें घेतलें आहे. बाकीचें सर्व भांडवल शिंदिया स्टीम नॅव्हिगेशन कं. लि. नें घातलें आहे. ह्या नव्या कंपनीचें अधिकृत भांडवल २५ लक्ष रुपये असून त्यापैकी १० लक्ष रुपयांचें भांडवल विकण्यांत आलेलें आहे. संस्थानाचे दिवाण हे डायरेक्टर बोर्डाचे अध्यक्ष आहेत.

# स्फुट विचार

## मित्रराष्ट्रांच्या सैन्यांची जर्मनींत चाल

युरोपांतील पश्चिम आघाडीवर मित्र सैन्यें जर्मनीमध्यें घुसलीं आहेत. ह्या वेळेपर्यंत मित्रराष्ट्रांच्या सैन्यांचा प्रतिकार स्वतः पादाक्रांत केलेल्या शेजारच्या देशांच्या प्रदेशांत शत्रू करीत होता. आतां त्यास प्रत्यक्ष स्वतःच्या देशाचा बचाव करण्याची पाळी आली आहे आणि त्या कारणानें त्याच्या लढायांची तीव्रता वाढली आहे. तथापि, ब्रिटिश, अमेरिकन व फ्रेंच फौजा हळु हळु जर्मनींत प्रगति करीत आहेत. जर्मन कितीहि कडवेपणानें लढले तरी त्यांचा पराजय आतां दृष्टिपथांत स्पष्टपणें आला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. जर्मन राष्ट्र सर्व दिशांनीं घेरलें गेलें आहे एवढेंच नव्हे तर त्याचा एकामागून एक भाग मित्र राष्ट्रांच्या ताब्यांत येऊं लागला आहे. ही प्रगति सध्या मर्यादित असली तरी अंतिम विजयाचा तो निश्चित प्रारंभ आहे ह्यांत संशय नाहीं. जग जिंकावयास निघालेल्या हिटलरला स्वतःचा देश गमवावा लागत आहे. ह्या परिस्थितींत सर्वस्वी हताश होईपर्यंत तो आपल्या लोकांस लढवीत राहील ही गोष्ट लक्षांत घेऊन मि. चर्चिल ह्यांनीं आपले युद्धप्रयत्न चिकाटीनें चालू ठेवण्याची सूचना ब्रिटिश जनतेस नुकतीच दिली आहे. युद्धाचा शेवट जवळ आला ह्या भावनेनें ब्रिटिश राष्ट्रानें यत्किंचितहि ढिलेपणा करतां कामा नये असें त्यांचें सांगणें असून युरोपांतल्या लढाया बंद होण्यास आणखी सात-आठ महिनेहि लागण्याचा संभव आहे असा इषारा त्यांनीं दिला आहे. लोकांच्या मनांत भलत्या आशा उत्पन्न करावयाच्या नाहींत, इतकेंच नव्हे तर त्यांचीं मनें अधिक स्वार्थत्यागास व अडचणींस तोंड द्यावयाच्या निश्चयास तयार करावयाचीं हें मि. चर्चिल ह्यांचें आजपर्यंत धोरण आहे आणि त्यांचें परवांचें युद्धविषयक भाषण त्यास सर्वस्वी धरून आहे. युरोपांतलें युद्ध संपल्याबरोबर जपानशीं अधिक जोरानें लढण्याची तयारी इंग्लंडला ठेवावयाची आहे ह्याचीहि आठवण त्यांनीं लोकांस करून दिली आहे. युरोपांतील पश्चिम आघाडीवर चाललेल्या लढायांच्या बातम्या येत आहेत त्यांवरून जर्मनांस स्वतःच्या देशांत हळु हळु माघार घ्यावी लागत आहे हें स्पष्ट दिसतें. तथापि, मि. चर्चिल ह्यांनीं दिलेल्या सावधगिरीची सूचना ध्यानांत बाळगली जाणें आवश्यक आहे.

---

## इंग्लंडचा प्रचंड युद्धप्रयत्न व स्वार्थत्याग

गेल्या पांच वर्षांत इंग्लंडला कोणत्या प्रचंड प्रमाणांत युद्धाचे पायीं मनुष्यप्राण, द्रव्य व संपत्ति वेचावी लागली आहे, ह्याची माहिती ब्रिटिश प्रसिद्धीखात्याचे मंत्री, मि. ब्रेंडन ब्रॅकन ह्यांनीं प्रकट रीतीनें दिली आहे. ब्रिटिश जनतेचा अपूर्व स्वार्थत्याग, तिची चिकाटी व शिस्त आणि तिचा दृढनिश्चय ह्यांची उत्कृष्ट कल्पना त्यांनीं दिलेल्या आकड्यांवरून येते. युद्धापूर्वी इंग्लंडच्या मालकीचें सोनें अमेरिकेंत होतें तें सर्व विकण्यांत येऊन त्याच्या सहायानें लढाऊ सामुग्री बनवण्यांत आली आणि बाहेरच्या देशांनीं पुरवलेल्या मालाची किंमत देण्यांत येऊन तो खरीदला आहे. युद्धपरिस्थितीमुळें ब्रिटिश जनतेस स्वतःचीं घरें सोडून स्थलांतर करावें लागलें आहे आणि अशा लोकांची संख्या सवादोन कोटींच्या घरांत गेली आहे. साडेपाच हजार कारखान्यांची खराबी झाली आहे आणि जबर करांच्या ओझ्यामुळें श्रीमान् व मध्यम स्थितींतल्या लोकांचा वर्ग बहुतेक नाहींसा झाला आहे. पांच वर्षांच्या अवधींत इंग्लंडनें एक लक्ष विमानें बनवलीं. सहा हजार मारमारी जहाजें आणि सव्वीस लक्ष टन वजनाचीं व्यापारी जहाजें इंग्लंडनें ह्या मुदतींत तयार केलीं आणि पंचेचाळीस लक्ष सैनिकांची फौज उभारली. शत्रूच्या हल्ल्यांमुळें ग्रेट ब्रिटनमधील एक तृतीयांश घरें नादुरुस्त झालीं, सत्तर लक्ष पुरुष लढाऊ धंद्यांत गुंतले आणि तितक्याच स्त्रिया कारखान्यांत काम करण्यास व इतर युद्ध कार्यक्रम पार पाडण्यास तयार झाल्या. होमगार्डमध्यें स्थानिक बचावासाठी साडेसतरा लक्ष लोकांची भरती झाली. म्हणजे, अगदीं लहान मुलें, वृद्ध गृहस्थ व आजारी माणसें वगळून बाकी सर्व ब्रिटिश जनता युद्ध-प्रयत्नांत सामील झाली. शेतींची जमीन तेरा दशलक्ष एकरांची एकोणीस दशलक्ष झाली आणि ह्या रीतीनें अन्नसामुग्रीची पैदास वाढवण्यांत आली. युद्धांत पावणेदोन लक्ष सैनिक कामास आले आणि शत्रूच्या बॉंबला अर्धा लक्ष लोक बळी पडले. एक कोटि, तीस लक्ष ब्रिटिश घरांपैकी पंचेचाळीस लक्ष पडलीं किंवा नादुरुस्त झालीं. समुद्रावर एक कोटि, पंधरा लक्ष टन वजनाचीं जहाजें बुडालीं. निर्गत व्यापारांत सत्तर टक्के घट झाली. सुमारें चौदाशे कोटि रुपयांचें ब्रिटिश भांडवल परदेशांत होतें तें संपून सुमारें तीन हजार कोटि रुपयांचें देणें इंग्लंडला झालें आहे. वरील माहिती, युद्धपरिस्थिति आतां अनुकूल झाल्यामुळें गुप्त ठेवण्याचें कारण राहिलेलें नाहीं म्हणून ब्रिटिश सरकारनें ती प्रसिद्ध केली आहे. तिचा उपयोग ब्रिटिश जनतेचा उत्साह वृद्धिंगत होण्यास आणि जगास इंग्लंडचा त्याग, निश्चयीवृत्ति व धैर्य ह्यांची कल्पना येण्यास झाल्यावांचून रहाणार नाहीं.

---

## कापड व्यापाऱ्यांची कानउघाडणी

मुंबईमधील कापड व्यापाऱ्यांच्या सभेंत हिंदुस्थान सरकारच्या औद्योगिक व बिनलष्करी पुरवठ्याच्या खात्याचे चिटणीस सर अकबर हैदरी ह्यांनीं त्यांच्या काळ्या बाजारांतील कारवायांस उद्देशून गेल्या आठवड्यांत चांगलीच कान उघाडणी केली. कापडाच्या किंमती योग्य प्रमाणांत उतराव्या ह्या उद्देशानें सरकारनें नियंत्रणाची विशिष्ट योजना अंमलांत आणली आणि तीमध्यें व्यापाऱ्यांचें सहकार्य मिळवण्यासाठी त्यांस सवलतीहि दिल्या. गिरणीवाले आणि कापड विकत घेणारी जनता ह्यांचा सदरहु योजनेस पाठिंबा मिळाला, पण व्यापारांनीं त्यांस देण्यांत आलेल्या नफ्यावर संतुष्ट न रहातां काळ्या बाजारांत भरमसाट किंमतींचा व्यवहार चालू ठेवला. सरकारची स्वस्त कापडाची योजना अयशस्वी करण्याचा चंग व्यापाऱ्यांनीं बांधला असल्याचें सर अकबर ह्यांस आढळून आल्यानें त्यांनीं ह्या लोकांस बजावलें कीं दोन महिन्यांच्या अवधींत कापड बाजारांत इष्ट सुधारणा झालेली न दिसल्यास सरकार सध्याचा काळा बाजार बंद पाडण्यासाठी कडक उपाय योजील आणि त्या योगानें व्यापाऱ्यांचा धंदा बसल्यास त्या आपत्तीची जबाबदारी त्यांच्या शिरावर राहील. स्वतःस मिळणाऱ्या नफ्याची मर्यादा सरकारनें वाढवून द्यावी अशी व्यापाऱ्यांची मागणी होती, तिला उद्देशून सर अकबर म्हणाले कीं त्यांचेपैकी कित्येक काळ्या बाजारांत पंचवीस टक्के फायदा उकळीत असतां त्यांस पाच टक्क्यांच्या वाढाव्याची आवश्यकता भासूं नये! काप-

ढाच्या व्यापारांत जेवढे मध्यस्थ व दलाल आहेत तेवढे अन्य व्यवहारांत क्वचित आढळतील, अशा स्थितींत व्यापाऱ्यांनीं समजूतदारपणानें वागून काळा बाजार बंद करावा, नाहींतर स्वतःचा धंदा गमावण्यास तयार व्हावें असा स्पष्ट इषारा गंभीर शब्दांत त्यांनीं दिला. ह्याचा योग्य परिणाम होऊन कापडाच्या काळ्या बाजारास आळा बसून जनतेची आजची कुचंबणा नाहींशी होईल अशी आशा आहे.

## दि बेलापूर कं. लि.

### भक्कम रिझर्व्ह व रोख्यांत गुंतवणूक

३० सप्टेंबर, १९४४ अखेर संपलेल्या वर्षी वरील कंपनीस २ लक्ष, ९३ हजार रुपये घसारा खातीं घालून १२ लक्ष, ५५ हजार रुपये नफा झाला. त्यांतून प्रत्येक १००च्या भागास ९ रु. डिव्हिडंड देण्यासाठी ६ लक्ष, ७७ हजार रुपये लागतील. रिझर्व्ह फंडांत १½ लाखाची भर पडेल, कराच्या तरतुदीसाठी ३ लक्ष रुपये लागतील व रहाण्याच्या घरांच्या योजनेसाठी १ लक्ष रुपये राखून ठेवले जातील. "कामास मजूर मिळणें अत्यंत कठीण होतें. दररोज कारखान्यांत ऊस पोचविण्यास बैलगाड्याहि मिळेनात. खतांचाहि तुटवडा होता. विलायती खतांच्या अभावीं भुइमुगाच्या पेंडीवर अवलंबून रहावें लागलें व कित्येक प्रसंगीं तीहि वेळेवर हातीं न आल्याकारणानें पिकास वक्तशीर मिळूं शकली नाहीं. कायद्याप्रमाणें मोठ्या प्रमाणावर धान्य पिकविण्याची सक्ती असल्याकारणानें १९४५-४६ च्या मोसमासाठी फारच कमी प्रमाणांत ऊंस मिळूं शकेल. कंपनीच्या जागेवर ३,७४९ एकरांत ऊंस लावलेला आहे, असा ३० सप्टेंबर, १९४४ चा आकडा आहे. चालू पीक खताच्या तुटवड्यामुळें व अनिश्चित पुरवठ्यामुळें नेहमीइतकें चांगलें नाहीं." कंपनीचें वसूल भांडवल ३७ लक्ष, ६० हजार रुपये आहे व तिनें रिझर्व्ह फंड, रिझर्व्ह अगेन्स्ट इन्व्हेस्टमेंट, कॉंटिन्जन्सीज फंड, क्रॉप इन्शुअरन्स फंड, घरें बांधण्याची योजना, कराची तरतूद, इत्यादि नांवांनीं सुमारें २२ लक्ष रुपयांचे फंड निर्माण केलेले आहेत. त्यांत चालू वर्षी सुमारें ६ लाखांची भर पडणार आहे. १९४३-४४ करतां कंपनीनें १० हजार रुपये इनकमटॅक्स दिला. कंपनीनें ८ लक्ष रुपये सरकारी रोख्यांत गुंतविलेले आहेत; गेल्या वर्षी हा आकडा फक्त १२ हजार रुपये होता.

## उद्योगी नागपूर

नागपूर शहरांतील लहानमोठे उद्योगधंदे, विमा कंपन्या, बँका, कारखाने यासंबंधीं नागपुरांतील व नागपूर बाहेरच्या व्यापारी वर्गाला उपयुक्त ठरणारी अशी समग्र माहिती देणारें एक प्रकाशन 'उद्योगी नागपूर' या नांवानें लवकरच प्रसिद्ध करण्यांत येणार आहे. या प्रकाशनाची पृष्ठसंख्या डेमी साईजचीं सुमारें ५०० पृष्ठांएवढी रहाणार असून त्याची किंमत ५ रु. ठेवण्यांत येणार आहे. व्यापाऱ्यांच्या माहितीकरितां त्यांत हिंदुस्थान व प्रांतिक सरकारांनीं वेळोवेळीं काढलेलें हुकूमहि समग्र देण्यांत येतील. या प्रकाशनांतील कांहीं पृष्ठें व्यापाऱ्यांच्या जाहिरातींसाठीं ठेवण्यांत येतील. शिवाय, युद्धोत्तर पुनर्घटनेच्या प्रश्नांवर अधिकारी लेखकांचे प्रसिद्ध होतील.

यासंबंधीं कोणास अधिक माहिती हवी असल्यास त्यानें ना. मो. केळकर, चंदनबाईचा बगीचा, शिरस पेठ, नागपूर (सी. पी.) या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

"मागोरा"चा अभिनव व आश्चर्यकारक शोध
ढेकणांच्या उदवत्त्या
(ABC)
BUG COILS (ABC)
प्रत्येक उदवत्ती रात्रभर जळते व तोंपर्यंत ढेकूण आपलें ठिकाण सोडून बाहेर येत नाहींत. विशिष्ट धुरामुळें हा चमत्कार होतो. बॉक्समध्यें १२ तांबड्या उदबत्त्या तांबड्या पॅकिंगमध्यें बॉक्स किं. रु. १।८, ट. ख. निराळा.
दि मागोरा केमिकल कं. लि.,
हिराबाग, पुणें २

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाऊस
बुधवार चौक, पुणें २.

—राष्ट्रीय काटकसर—
युद्धकार्याची गरज लक्षांत घेऊन डबे वा कागद यांची बचत करणें भाग आहे. ही पॅकिंगबाबतची अडचण लक्षांत घेऊन—
-गोल्डन कोको-
सुटा मिळण्याची सोय सर्व प्रमुख व्यापाऱ्यांकडे करण्यांत येत आहे. सुटा कोको घेण्यानें पैशाचीही बचत होते. मात्र आपणांस गोल्डन कोकोच मिळत आहे अशी खात्री करून घ्या. नांव लक्षांत ठेवा.
साठे बंधू, "गोल्डन कोको"
—सर्वत्र मिळतो—
साठे कोको व चॉकोलेट कारखाना, पुणें २.

### डिस्ट्रिक्ट व सेशन्स जज्ज ह्यांची नेमणूक— आय. सी. एस. कशाला ?

सर जॉन बोमंट ह्यांनीं ईस्ट इंडिया असोसिएशनमध्यें वाचलेल्या आपल्या निबंधांत हिंदुस्थानांत–विशेषतः मुंबई प्रांतांत डिस्ट्रिक्ट व सेशन जज्जांच्या नेमणुका होतात,त्यासंबंधीं आपले विचार निर्भीडपणें व्यक्त केले. प्रत्येक जिल्ह्यासाठी एक डिस्ट्रिक्ट व सेशन्स जज्ज नेमलेला असतो. त्यांस अत्यंत विस्तृत फौजदारी अधिकार असतात व डिस्ट्रिक्ट जज्ज ह्या नात्यानें तो सबजज्जांकडील अपीलें ऐकतो. आपल्या जिल्ह्यांतील सर्व दिवाणी कोर्टांचीं कामें नीट चाललीं आहेत किंवा नाहींत हें पहाण्याचें काम त्याचें असतें व त्याचे मार्फतच हायकोर्ट आपल्या देखरेखीचें काम बजावतें. वकीलवर्ग, सबजज्जांची बढती व आय. सी. एस. ह्यांतून डिस्ट्रिक्ट जज्ज नेमले जातात. एकूण डिस्ट्रिक्ट जज्जांपैकी साधारणतः निम्मे आय. सी. एस. पैकी असतात. "कांहीं आय. सी. एस. मधील लोक न्यायखात्याकडे वर्ग होण्यास तयार असतात. परंतु कित्येक अशा नेमणुकीस विरोध दर्शवितात. सरकारी कारारभांत भाग घेण्याच्या बुद्धीनें मनुष्य आय. सी..एस. मध्यें जातो. त्याला जज्ज व्हायचें असेल तर तो वकिलीच्या धंद्याकडेच वळेल" असें सर जॉन बोमंट ह्यांचें मत आहे. कित्येक सनदी नोकरांनीं जज्जांचें काम चांगल्या रीतीनें केलेलें आहे. हे लोक हुशार व कार्यक्षम असतात व त्यांनीं कठोर परीक्षा देऊनच आपली लायकी सिद्ध केलेली असते. तथापि "प्रारंभींच्या शिकाऊ तरुण वयांत ज्यांनीं सरकारी नोकरी केली, अशांत स्वतंत्र वृत्तीचा अभाव दिसून येतो, सरकारी बाजूनेंच प्रत्येक प्रश्नाकडे पहाण्याची त्यांची प्रवृत्ति होते व ज्या प्रकारच्या गोष्टी आपण स्वतः केल्या आहेत, अशांना आतां बेकायदा ठरविण्यास ते उत्सुक नसतात. कोर्टांत स्वतः कामें केलेलीं नसल्या कारणानें इतर जज्ज कामें कशीं चालवितात, हें त्यांस पहावयास मिळत नाहीं व वकिलांशीं युक्तीनें वागणें त्यांस साधत नाहीं. सरकारी नोकरांतून जज्जांची निवड करणें हें घटनेच्या मूलतत्वांशीं विसंगत आहे. इतर कोठें दुसरे जज्ज मिळूं शकत नसतील, अशा अपरिहार्य परिस्थितींत गोष्ट वेगळी. फार काळापूर्वी अशी परिस्थिति होती, परंतु अजूनहि ती तशीच आहे काय व वकील वर्गांतून लायक जज्ज मिळूं शकत नाहींत काय, हा महत्वाचा प्रश्न आहे. मुंबई प्रांतापुरतें बोलावयाचें झाल्यास, प्रांतिक न्यायखात्यांतून व वकील वर्गांतून कार्यक्षम जज्ज सहज मिळूं शकतील व त्यांतील सर्वोत्कृष्ट जज्जांना हायकोर्टांत बढती देण्यासाहि हरकत नाहीं. वकील वर्ग आपल्यास न्यायाधीशाची जागा पुढें मागें मिळूं शकेल अशी नेहमी अपेक्षा करीत असतो आणि ती वाजवीहि पण आहे. हिंदुस्थानांतील वकीलवर्ग वजनदार व जागरूक आहे व त्यास निष्कारण तक्रारीस जागा देणें शहाणपणाचें ठरणार नाहीं." वरील शब्दांत सर बोमंट ह्यांनीं आपले विचार सडेतोडपणें मांडले आहेत. हायकोर्टांतील कांहीं जागा सनदी नोकरांसाठीं राखून ठेवलेल्या असत, त्या हिंदी घटना कायद्यानें रद्द केल्या असल्या तरी सनदी नोकर इतरांपेक्षा कमी वयाचे असतांना डिस्ट्रिक्ट जज्ज होत असल्याकारणानें त्यांस श्रेष्ठत्व प्राप्त होऊन हायकोर्टांतील बहुसंख्य जागा सहज मिळवितां येतात हा मुद्दा सर बोमंट ह्यांनींच स्पष्ट केला आहे. हिंदी वकील वर्गांतून लायक जज्ज मिळण्याची सुलभता व सनदी नोकरांतून त्यांची निवड करण्याची अनिष्टता ह्यांचें विवरण सर बोमंट ह्यांच्या सारख्या अनुभवी सेवानिवृत्त सरन्यायाधीशानें केलें आहे, त्याकडे लक्ष वेधणें हा येथें उद्देश आहे. जज्जांच्या नेमणुका करण्याची पद्धत बदलण्याचा प्रश्न अर्थातच लोकांच्या हातीं नाहीं, हिंदुस्थान सरकारच्या अधिकारांतहि तो येत नाहीं. सर जॉन बोमंट ह्यांच्या निबंधवाचनानंतर कांहीं उपवक्त्यांनी आय. सी. एस. जज्जांच्या नेमणुकीचें समर्थन केलें, त्यांत अनपेक्षित कांहीं नाहीं नाहीं, परंतु त्यास सर बोमंट ह्यांनीं योग्य उत्तरें देऊन आपल्या मूळ मुद्यांचेंच समर्थन केलें.

---

### लिमिटेड कंपन्यांच्या भागांचें तारण

लिमिटेड कंपन्यांचे शेअर्सचे तारणावर पुष्कळ वेळां बँका व इतर संस्था पैसे कर्जाऊ देतात. कित्येक कंपन्यांचे नियमांत " कंपनीचा, तिच्या प्रत्येक शेअरवर पहिला बोजा असेल " अशा अर्थाचा मजकूर असतो. ह्याचा अर्थ, एकाद्या कंपनीस तिच्या भागीदारानें कांहीं देणें असल्यास, तें देणें वसूल होईपर्यंत भागीदाराचे शेअर्स दुसऱ्यास वर्ग न करूं देण्याचा अधिकार कंपनीस आहे, असा होतो. हा अधिकार शेअर्सपुरताच नसून त्यावरील डिव्हिडंडवरहि राहूं शकतो. एकाद्या भागीदारानें बँकेकडून भागांच्या तारणावर कर्ज काढलें व बँकेनें कर्जाच्या वसुलीचे पोटीं शेअर्स स्वतःच्या नांवानें वर्ग करून कंपनीकडे मागितले, तर अशा शेअर्सवर कंपनीचा पहिला बोजा असल्याकारणानें कंपनीचे भागीदाराकडील येणें वसूल होईपर्यंत शेअर्स वर्ग करण्यास कंपनी तयार होणार नाहीं. सहाजिकच, कर्ज देणाऱ्या बँकेचें तारण कमी होईल. शेअर्स वर्ग केले, तर मात्र कंपनीनें त्यावरील आपला बोजा सोडून दिला आहे, असा अर्थ होतो. मि. मेयर निसिम ह्यांच्या एशियन कंपनीमधील शेअर्सबद्दल झालेला मुंबई हायकोर्टाचा ह्यासंबंधांतील निवाडा बोधप्रद आहे. मि. निसिम ह्यांच्या नांवें एशियनचे २६,००० शेअर्स होते. मि. निसिम ह्यांनीं एका बँकेस ते तारण देऊन बँकेकडून कर्ज घेतलेलें होतें. श्री. जमनादास मेहता ह्यांनीं मि. निसिम ह्यांच्यावरील कर्जांची जबाबदारी पत्करून वरील २६,००० शेअर्समध्यें हितसंबंध निर्माण केला होता, असें सांगण्यांत आलें व त्याप्रमाणें हे शेअर्स श्री. जमनादास मेहता ह्यांच्या नांवानें वर्ग करण्यांत यावे, अशी बँकेनें एशियन कंपनीकडे मागणी केली. अर्थातच, कंपनीनें ती अमान्य केली. कंपनीच्या आर्टिकल्सप्रमाणें, मि. निसिम ह्यांच्या भागांवर कंपनीचा बोजा असल्याकारणानें मि. निसिम ह्यांच्या एशियनमधील भागांचें इतर ठिकाणचें तारण निरुपयोगी ठरलें, असा हायकोर्टाच्या निवाड्याचा अर्थ होतो.

---

### बॉम्बहल्ल्यांस बळी

जुलै १९४४ मध्यें ग्रेटब्रिटनवर झालेल्या बॉंबहल्ल्यांत २,४४१ लोकांना मृत्यु आला व ७,१०७ लोक जखमी होऊन त्यांस इस्पितळांत ठेवून घ्यावें लागलें.

---

### म्हैसूरमध्यें २२६ गांवांत वीज

म्हैसूर संस्थानांतील २२६ गांवांत व सेड्यांत उजेड, पाणी तापवणें, पिण्याचें पाणी व शेतीसाठी विहिरींतून पाणी काढणें वगैरे कामासाठी व दळण्याच्या, तांदूळ सडण्याच्या व तेलाच्या गिरण्यांसाठी विजेचा उपयोग केला जातो.

## पूना गेस्ट हाऊस

संस्थापक :
कै. नानासाहेब सरपोतदार
टेलिफोन नं. ७७९

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्यांचे व्यापारी
गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

प्रगतिपथावरील नवा
## मैलाचा — दगड

सन १९४३ अखेर

| | |
|---|---|
| नव्या कामांत | ११० टक्के वाढ |
| चालू कामांत | १०० टक्के वाढ |
| आयुर्विमानिधींत | ८० टक्के वाढ |

— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —

## दि औंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.

आर. जी. साठे — सुपरिंटेंडेंट
व्ही. जी. जोशी — मॅनेजिंग डायरेक्टर

## दि ब्रिटिश इंडिया जनरल इन्शुअरन्स कं. लि.

( स्थापना : १९१९ )

आम्ही आयुर्विम्याखेरीज करून आग, मरीन, अपघात, इत्यादींचे सर्व प्रकारचे विमे स्वीकारतों.

—: चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर :—
सर होमी मेहता, के. बी. ई., जे. पी.

पुणें शाखा :
मोति-माणिक मॅन्शन,
लक्ष्मी रोड.

हेड ऑफिस :
मेहता हाऊस,
अपोलो स्ट्रीट, मुंबई.

## न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

( Approved Re-treaders and Approved Contractors )
२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

### महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. धोंडो वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२०।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.